


# परळी संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.



https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 107 | मंगळवार दि. 12 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# महाराष्ट्र शासनाच्या उपवर्गीकरणाविरोधात बीडमध्ये आंबेडकरवादी समाजाचा एल्गार

## जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा; अ, ब, क, ड उपवर्गीकरण तात्काळ रद्द करण्याची जोरदार मागणी







बीड प्रतिनिधी :महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा घेतलेला निर्णय हा समाजात फूट पाडणारा असून जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप करत बीड जिल्ह्यातील आंबेडकरवादी समाजाने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढत जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

अ, ब, क, ड उपवर्गीकरण रद्द करा, सविधान वाचवा, आरक्षणावर घाला चालणार नाही, एकच अँडा आंबेडकरवादी ऐक्य अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले होते. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो समाजबांधवांनी या मोर्चात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. नगर रोड़ मार्ग हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी बौद्ध, चांभार, ढोर, होलार यांसह विविध मागासवर्गीय समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती, निळे झंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो आणि घोषणांनी परिसर आंबेडकरमय झाला होता. मोचांदरम्यान विविध वक्त्यांनी शासनाच्या भूमिकेवर जोरदार टीका केली. राजकीय स्वार्थासाठी समाजात भांडणे पान 3 वर

# आज ठळक

## अपात्र लाडक्या बहिणींमुळे सरकारची दहा हजार कोटींची बचत, ह्या आठवड्यात मार्च-एप्रिलचे अनुदान?




मुंबई: महायुती सरकारची अत्यंत महत्त्वकांक्षी ठरलेली “मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” योजनेची अंतिम पडताळणी एप्रिल अखेर पूर्ण झाली. त्यातील पात्र अपात्र बहिणींची आकडेवारी समोर आली आहे. राज्यात आता फक्त 1 कोटी 77 लाख लाडक्या बहिणी पात्र ठरल्या आहेत. अंतिम पडताळणी नंतर 66 लाख लाडक्या बहिणी अपात्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. सरकारचे या योजनेवर महिन्याला आता 2 हजार 655 कोटी खर्च होणार आहेत. यापूर्वी हा खर्च 3 हजार 600 कोटी रुपये होता. सरकारचे वर्षाला यामुळे दहा हजार कोटी वाचणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात झालेल्या पराभवावर काहीतरी जालीम उपाय शोधण्याची गरज महायुती सरकारला वाटली. त्यानंतर मध्य प्रदेशात यशस्वी ठरलेली लाडली बहीण योजना महाराष्ट्रात लागू करण्याचे ठरले. तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी क्षणाची उसंत न घेता ही योजना जून 2024 मध्ये जाहीर केली.

सरकारच्या वतीने दरमहा गरीब गरजू महिलांच्या बँक खात्यात 1500 रुपये घरपोच देण्याचे आश्वासन सरकारने दिले. या योजनेसाठी सरकारने सहा प्रकारचे निकष लावले होते पण ते नंतर पायदळी तुडवण्यात आले. सर्वच राजकीय पक्षांनी या योजनेचा फायदा त्यांच्या महिला मतदारांना व्हावा यासाठी पक्ष कार्यालयात योजनेचे अर्ज भरून पान 3 वर

# परळी वैजनाथ येथून 45 वर्षीय महिला बेपत्ता



परळी प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातून एक 45 वर्षीय महिला बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. मंदाकिनी दशरथ कापसे या दि. 7 मे 2026 रोजी घरातून बाहेर गेल्यानंतर अद्याप परत आलेल्या नाहीत. त्यांच्या कुटुंबीयांनी नागरिकांना शोधकार्याबाबत मदतीचे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंदाकिनी कापसे यांचा रंग गोरा असून उंची अंदाजे 5 फूट 1 इंच आहे. त्या घरातून बाहेर पडताना गुलाबी रंगाचा टॉप, पांढरी पँट आणि लाल रंगाची ओढणी परिधान केली होती. त्यांच्या तोंडाचे ऑपरेशन झाल्यामुळे त्यांना बोलता येत नसल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे.

ही महिला परळी वैजनाथ परिसरात हरवली असून, कोणाला त्या दिसल्यास किंवा त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास खालील क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्क क्रमांक :9850574835,7620912021,9373063536,9637835190,8080000823

नागरिकांनी सदर महिलेचा शोध घेण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे.

# देशाच्या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व आता महाराष्ट्राच्या हाती – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई: पायाभूत सुविधा, नाविण्यपूर्णता, प्रतिभा, स्वच्छ ऊर्जा, सुव्यवस्थित शहरीकरण,तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवरून भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार आहे. या सर्व शक्तींचा सहयोग साधणाऱ्या अर्थव्यवस्था भविष्याचे नेतृत्व करणार असल्याने महाराष्ट्र त्यादृष्टीने आवश्यक परिसंस्था (इकोसिस्टीम) उभारत आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढील युगासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

नवी दिल्ली येथील हॉटेल ताज पॅलेसमध्ये भारतीय उद्योग परिसंघा तर्फे (सीआयआय) आयोजित दोन दिवसीय परिषदेत एका परिसंवादात ( Vision For India @100) मुख्यमंत्री बोलत होते. सीआयआयचे संचालक जनरल चंद्रदीप बॅनर्जी आणि अध्यक्ष राजीव मेमाणी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

आजचे जग एकाच वेळी अनेक स्थित्यंतरातून जात आहे.यात भू-राजकीय विखंडन, पान 3 वर

# 20 जिल्हा परिषदांच्या रखडलेल्या निवडणुकांबाबत : सुप्रीम कोर्टाने दिला पावसाळ्यातील मुहुर्त



राज्यातील 20 जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील ओबीसी आरक्षण वाढल्याने सुप्रीम कोर्टाने या ठिकाणच्या निवडणुका परत घेण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे पहिल्या टप्प्यात 12 जिल्हा परिषद व 125 पंचायत समितीच्या निवडणुका पार पडल्या होत्या. त्यानंतर जवळपास 20 जिल्हा परिषद निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु आहे. त्यामुळे येत्या काळात निवडणुकीची घोषणा कधी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच सोमवारी या निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टातून मोठी अपडेट समोर आली आहे.

सुप्रीम कोर्टात सोमवारी राज्यातील आरक्षणाअभावी रखडलेल्या 20 जिल्हा परिषद निवडणुकीबाबत सुनावणी पार पडली. यावेळी कोर्टाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची सुनावणी पुढे ढकलली आहे. या प्रलंबित निवडणुकाबाबत सुनावणी पार पडली. यावेळी बाजू मांडल्यानंतर सुप्रीम कोर्टाने या प्रकरणी उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर कोर्टासमोर सुनावणी पान 3 वर

# सोनं खरेदी करू नका म्हणताच सरकारला मोठा विरोध, 3 कोटी कारागिरांचं काय होणार? चिंता वाढली!



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्षभरासाठी कोणीही सोनं खरेदी करू नका, असे आवाहन केले आहे. या आवाहनानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदींवर सडकून टीका केली आहे. मोदींचा हा नाकर्तेपणा आहे, असं राहुल गांधी म्हणाले आहेत. मोदींच्या सोनं खरेदी न करण्याच्या आवाहनानंतर सराफा बाजारातील लोकांची गर्दी कमी झाली आहे. सोबतच सोन्याचा भावही घसरला आहे. दरम्यान या सर्व घडामोडीनंतर आता सराफा व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. मोदींच्या या आवाहनाला सराफा व्यापाऱ्यांकडून विरोध होत आहे.मोदींनी सोने खरेदी न करण्याच्या आवाहनानंतर सोन्याचा भाव घसरला आहे. सराफा व्यापाऱ्यांनी मात्र याबाबत चिंता व्यक्त केली आहे. पुण्याच्या राजगुरु नगरातील सराफा बाजारात सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. सध्या लग्नसराई आहे. तरीही दागिन्यांच्या दुकानात ग्राहकांची गर्दी दिसत नाहीये. पुण्यातील सराफा व्यवसायावर कोणताही परिणाम होणार नाही, असा विश्वास पुण्याच्या सराफा असोशिएशनचे उपाध्यक्ष अभय गाडगीळ म्हणाले आहेत. व्यापाऱ्यांत कोणताही संभ्रम नाही. लोक सोनं खरेदी करतील, असेही ते म्हणाले.दुसरीकडे ज्वेलरी मेकिंगवर उदरनिर्वाह असणाऱ्या 3 कोटी कारागीरांचं काय होणार, असा सवाल ऑल इंडिया ज्वेलर्स असोशिएशनकडून पान 3 वर

# ना.पंकजाताई मुंडे यांनी सरस्वती नदी कॉँक्रीटीकरणा पासून वाचवल्याबद्दल आभार; अश्विन मोगरकर



परळी वैजनाथ: शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीपात्राचे खोलीकरण करताना त्या ठिकाणी सिमेंट काँक्रिटीकरण करू नये, अशा स्पष्ट सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षा व नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. या निर्णयामुळे गाव भागातील जलस्त्रोत सुरक्षित राहण्यास मदत होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. परळीकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्वरित कार्यवाही केल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचे हजारों परळीकरांच्या वतीने अश्विन मोगरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

गावभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदी साठी शासनाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र, नदीपात्राच्या तळाशी काँक्रिटीकरण केल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरणार नाही, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली होती. नदीपात्रातून पाणी झिरपल्यामुळेच गाव भागातील आड आणि बोअरची पाणी पातळी टिकून राहते. जर काँक्रिटीकरण झाले, तर भविष्यात पाणीटंचाईचे मोठे संकट उभे राहील, असे गाऱ्हाणे नागरिकांनी पंकजाताई मुंडे यांच्याकडे मांडले होते.

सरस्वती नदीचे धार्मिक महत्व पौराणिक पान 3 वर



# भुकेल्यांच्या ताटात माणुसकीचा घास!

## परळीमध्ये ग्लोबल विकास ट्रस्टच्या मोफत अन्नछत्र सेवेचा शुभारंभ




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) समाजातील गरजू, शेतकरी आणि कष्टकरी बांधवांच्या पोटाची भूक भागवण्याचा मानवतेचा वसा घेत जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने परळी वैजनाथ येथे “मोफत अन्नछत्र” सेवेचा सोमवारी, दि. 11 मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरालगत, संकटमोचन हनुमान मंदिरासमोर सुरु करण्यात आलेली ही सेवा अनेक गरजूंना आधार देणारी ठरणार आहे. महाराष्ट्र पान 3 वर

# गर्भवती महिला हेळसांड: गर्भातील बाळाच्या मृत्यू प्रकरणी चौकशी समिती परळीत दाखल



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):परळी शहरातील गित्ते हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, या प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी नियुक्त केलेली चार सदस्यीय समिती परळीत दाखल झाली आहे. समितीने संबंधित गित्ते हॉस्पिटलला भेट देत प्राथमिक माहिती घेतली.

गित्ते हॉस्पिटलच्या डॉ.कल्पना सचिन गित्ते या डॉक्टरांच्या कथित निष्काळजीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला पान 3 वर

# भाजपच्या विजयात काँग्रेसचा फायदा

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी भारतीय राजकारणाची दिशा आणि स्वरुप दोन्ही बदलण्यास सुरुवात केली आहे. वरवर पाहता हे निकाल भाजपच्या मोठ्या राजकीय विजयाचे प्रतीक वाटतात. पश्चिम बंगालमध्ये प्रथमच सत्तेपर्यंत पोहोचणे, आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणे, पुद्दुचेरीमध्ये सहयोगी पक्षांसह पुन्हा सत्तेत भागीदारी मिळवणे आणि केरळसारख्या राज्यातही हळूहळू राजकीय पायाभरणी मजबूत करणे या सर्व गोष्टी भाजपच्या विस्तारवादी राजकारणाचे मोठे यश मानल्या जात आहेत. मात्र, राजकीय विश्लेषणाच्या दृष्टीने पाहिले, तर या निवडणुकांमधून सर्वाधिक दीर्घकालीन फायदा काँग्रेसला होण्याची शक्यता दिसून येते.

मंडल आयोगानंतर अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष उभे राहिले, ज्यांनी काँग्रेसचा पारंपरिक राजकीय मतदार हिरावून घेतला. यामुळे राज्याच्या राजकारणात काँग्रेसची जागा प्रादेशिक पक्षांनी घेतली आणि काँग्रेस राष्ट्रीय पक्ष म्हणून टिकून राहिला; पण राज्यांतील प्रभाव गमावत गेला. याच राजकीय पोकळीचा फायदा भाजपने घेतला. भाजपने केवळ काँग्रेसविरोधातच लढाई केली नाही, तर त्या प्रादेशिक पक्षांनाही आव्हान दिले, जे एकेकाळी काँग्रेसच्या पतनाचे प्रतीक मानले जात होते. संघटनशक्ती, आर्थिक साधने, आक्रमक प्रचारयंत्रणा आणि नरेंद्र मोदी-अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने अशा राज्यांतही प्रवेश केला, जिथे पूर्वी त्यांची उपस्थिती केवळ प्रतीकात्मक स्वरूपाची होती. पश्चिम बंगालमध्ये कधी भाजपचे दोन-तीन आमदार असत, त्याच राज्यात आज पक्ष सत्तेपर्यंत पोहोचला. ही केवळ निवडणुकीतील विजयाची कथा नसून, दीर्घकालीन राजकीय विस्ताराची कहाणी आहे.मात्र, याच टप्प्यावर काँग्रेससाठी नव्या राजकीय संधी निर्माण होताना दिसतात. भाजपने जे प्रादेशिक पक्ष कमकुवत केले, ते अनेक वर्षे काँग्रेसच्या पारंपरिक सामाजिक आणि राजकीय आधारावर उभे होते. आता जेव्हा हे पक्ष सत्तेबाहेर जात आहेत, तेव्हा त्यांच्या पारंपरिक मतदारांसमोर आणि कार्यकर्त्यांसमोर राजकीय भविष्याचा प्रश्न उभा राहत आहे. काँग्रेसची सर्वात मोठी अडचण अशी होती की, राष्ट्रीय स्तरावर भाजपविरोधात लढताना राज्यांमध्ये ती प्रादेशिक पक्षांनी वेढलेली होती. भाजपविरोधी राजकारणाचा केंद्रबिंदू ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, अरविंद केजरीवाल, एम. के. स्टालिन आणि तेजस्वी यादव यांसारख्या प्रादेशिक नेत्यांभोवती फिरत होता. त्यामुळे काँग्रेस हळूहळू विरोधकांची प्रमुख शक्ती न राहता सहयोगी पक्षाच्या भूमिकेत जात होती.

# बँकिंग कायदा आणि चलनक्षम दस्तऐवज : आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा

**डॉ. भारत कऱ्हाड**



आजच्या आधुनिक जगात आर्थिक व्यवहार हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहेत. व्यक्ती, उद्योग, व्यापारी संस्था, शैक्षणिक संस्था, सरकार आणि समाजातील विविध घटक हे सर्वच आर्थिक देवाणघेवाणीवर आधारित कार्य करतात. पूर्वी व्यवहार रोख स्वरूपात होत असत; मात्र व्यवहारांची व्याप्ती वाढल्यामुळे सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर पद्धतींची गरज निर्माण झाली. या गरजेतून बँकिंग व्यवस्था विकसित झाली आणि त्याचबरोबर धनादेश, प्रतिज्ञापत्र, विनिमयपत्र यांसारख्या चलनक्षम दस्तऐवजांचा वापर वाढला. या संपूर्ण व्यवस्थेला कायदेशीर चौकट देण्यासाठी बँकिंग कायदा आणि चलनक्षम दस्तऐवज कायदा अस्तित्वात आले. कोणत्याही देशाची आर्थिक व्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी हे दोन्ही कायदे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात.

बँकिंग कायदा म्हणजे बँकांचे कार्य, ग्राहकांशी असलेले संबंध, ठेवी, कर्ज, व्यवहार, सुरक्षितता आणि आर्थिक जबाबदाऱ्या यांचे नियमन करणारा कायदा होय. बँक ही केवळ पैसे ठेवण्याची जागा नसून ती अर्थव्यवस्थेचे रक्ताभिसरण करणारी संस्था आहे. सामान्य नागरिकांचे बचत खाते, उद्योगांचे आर्थिक व्यवहार, शेतकऱ्यांचे कर्ज, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कर्ज, शासनाच्या योजना, डिजिटल व्यवहार अशा असंख्य गोष्टी बँकांमधूनच चालतात. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात शिस्त, विश्वास आणि पारदर्शकता आवश्यक असते. हीच जबाबदारी बँकिंग कायदा पार पाडतो.

भारतात बँकिंग क्षेत्राचे प्रमुख नियमन भारतीय रिझर्व्ह बँक आणि विविध बँकिंग कायद्यांद्वारे केले जाते. बँक ग्राहकांकडून ठेवी स्वीकारते आणि त्या निधीचा वापर कर्जरूपाने इतरांना करते. त्यामुळे बँक आणि ग्राहक यांच्यात विशेष प्रकारचे संबंध निर्माण होतात. ग्राहकाने पैसे जमा केले तर बँक देणेकरी बनते, तर ग्राहकाने कर्ज घेतले तर ग्राहक देणेकरी बनतो. बँक अनेक वेळा ग्राहकाची एजंट म्हणून काम करते. उदाहरणार्थ, चेक वटवणे, पैसे हस्तांतरित करणे, ड्राफ्ट काढणे किंवा बिल वसूल करणे ही कामे बँक ग्राहकाच्या वतीने करते.

बँकेवर काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या असतात. ग्राहकाच्या खात्याची गोपनीयता राखणे ही त्यातील सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे. ग्राहकाच्या खात्यात पुरेशी रक्कम असल्यास बँकेने त्याचा चेक मान्य करणे आवश्यक असते. ग्राहकाला अचूक माहिती देणे, व्यवहारात दक्षता घेणे आणि फसवणूक टाळणे या जबाबदाऱ्याही बँकेवर असतात. दुसरीकडे बँकेलाही काही अधिकार दिलेले आहेत. ग्राहकाने घेतलेले कर्ज फेडले नाही तर बँकेला तारण ठेवलेल्या मालमत्तेवर हक्क मिळतो. तसेच ग्राहकाच्या विविध खात्यांमधील शिल्लक रक्कम समायोजित करण्याचा अधिकारही बँकेला असतो.

आजच्या डिजिटल युगात बँकिंग क्षेत्रात प्रचंड बदल झाले आहेत. इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, यूपीआय, एटीएम, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड या माध्यमातून व्यवहार अधिक सोपे झाले आहेत. मात्र त्याचबरोबर सायबर गुन्हे, फसवणूक, हॅकिंग, बनावट व्यवहार यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. त्यामुळे बँकिंग कायद्याचे महत्त्व अधिक वाढले आहे. ग्राहकांनीही जागरूक राहणे आवश्यक आहे. पासवर्ड, ओटीपी, खाते क्रमांक यांची सुरक्षितता राखणे ही आजची गरज बनली आहे.

बँकिंग कायद्याइतकाच महत्त्वाचा कायदा म्हणजे चलनक्षम दस्तऐवज कायदा. भारतात हा कायदा 1881 मध्ये लागू करण्यात आला. व्यापार आणि आर्थिक व्यवहार सुरळीतपणे चालावेत यासाठी या कायद्याची निर्मिती झाली. चलनक्षम दस्तऐवज म्हणजे असा लेखी आर्थिक दस्तऐवज ज्यामध्ये ठराविक रक्कम देण्याचे आश्वासन किंवा आदेश असतो आणि जो एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे सहज हस्तांतरित करता येतो. या दस्तऐवजांमुळे व्यापारातील व्यवहार अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनतात.

चलनक्षम दस्तऐवजांचे मुख्य तीन प्रकार आहेत – प्रतिज्ञापत्र, विनिमयपत्र आणि धनादेश. प्रतिज्ञापत्र म्हणजे एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला ठराविक रक्कम देण्याचे लेखी आश्वासन. उदाहरणार्थ, "मी अमुक व्यक्तीस दहा हजार रुपये देण्याचे वचन देतो" असे लिहिल्यास ते प्रतिज्ञापत्र ठरते. विनिमयपत्रामध्ये एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस तिसऱ्या व्यक्तीला पैसे देण्याचा आदेश दिलेला असतो. धनादेश म्हणजे बँकेवर काढलेला आर्थिक दस्तऐवज होय. आजच्या काळात चेक हा सर्वात परिचित आणि मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा चलनक्षम दस्तऐवज प्रकार आहे.

चलनक्षम दस्तऐवजांची काही वैशिष्ट्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. हे दस्तऐवज सहज हस्तांतरित करता येतात. ज्याच्या हाती ते दस्तऐवज वैध पद्धतीने येते त्याला त्यावरील हक्क मिळतो. व्यवहारातील विश्वास टिकवण्यासाठी ही व्यवस्था महत्त्वाची आहे. व्यापारात मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम बाळगण्याची गरज कमी करण्याचे कार्यही चलनक्षम दस्तऐवज करतात. त्यामुळे चोरी, दरोडा किंवा रोख व्यवहारातील धोके कमी होतात.

धनादेशाच्या व्यवहारात अनेक वेळा "चेक बाऊन्स" होण्याच्या घटना घडतात. खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे किंवा इतर तांत्रिक कारणांमुळे चेक नाकारला जातो. अशा वेळी संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. भारतात चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील कलम 138 अंतर्गत चेक बाऊन्स हा दंडनीय गुन्हा मानला जातो. त्यामुळे व्यवहार करताना प्रामाणिकपणा आणि आर्थिक शिस्त अत्यंत आवश्यक आहे.

चलनक्षम दस्तऐवजांमध्ये "एंडोर्समेंट" म्हणजेच पाठीमागे सही करून दस्तऐवज दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्याची पद्धत महत्त्वाची मानली जाते. व्यापारी व्यवहारात याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. "होल्डर इन ड्यू कोर्स" ही संकल्पनाही या कायद्यात महत्त्वाची आहे. योग्य पद्धतीने आणि प्रामाणिक हेतूने दस्तऐवज प्राप्त करणाऱ्या व्यक्तीस विशेष कायदेशीर संरक्षण दिले जाते. यामुळे आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वास टिकून राहतो.

आज भारत डिजिटल व्यवहारांच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. ऑनलाइन व्यवहार वाढत असले तरी चेक, ड्राफ्ट, प्रतिज्ञापत्र यांचे महत्त्व पूर्णपणे कमी झालेले नाही. अनेक शासकीय, शैक्षणिक, व्यावसायिक आणि कायदेशीर व्यवहार अजूनही या दस्तऐवजांच्या माध्यमातून केले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी, व्यापाऱ्यांनी, उद्योजकांनी आणि सामान्य नागरिकांनी बँकिंग कायदा व चलनक्षम दस्तऐवज कायद्याची माहिती असणे आवश्यक आहे.

आर्थिक प्रगतीसाठी केवळ पैसा पुरेसा नसतो; तर त्या पैशाच्या व्यवहारात विश्वास, सुरक्षितता आणि कायदेशीर संरक्षण आवश्यक असते. बँकिंग कायदा आणि चलनक्षम दस्तऐवज कायदा हे दोन्ही कायदे समाजात आर्थिक शिस्त निर्माण करतात. नागरिकांचा बँकिंग व्यवस्थेवर विश्वास टिकवून ठेवण्याचे कार्य हे कायदे करतात. आधुनिक अर्थव्यवस्थेच्या भक्कम पायाभरणीत या कायद्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे या विषयाचा अभ्यास केवळ वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर प्रत्येक सुजाण नागरिकासाठी आवश्यक ठरतो.

# सद्गुरूबाबा हरदेवसिंहजी महाराज : निरंकारी जगताचा समर्पण दिवस!

**(13 मे: पू.निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज पुण्यस्मरण व निरंकारी समर्पण दिन)**

"जीवन के हैं दो किनारे एक जन्म हैं एक मरण।
जो जन्मा हैं वो मरता हैं धनवंता हैं या निर्धन।
जन्म मरण के बीच का जीवन श्रेष्ठ हैं अनमोल हैं।
कहें 'हरदेव' कि गुरु ज्ञान से पड़ता इसका मोल हैं।"
[ पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.160]

आजच्या बहुढंगी, बहुरंगी दुनियेत स्वतःला ईश्वरी अवतार मानून आपले बाजारमूल्य वाढविण्याची स्पर्धा भक्तीपंथात जोमाने फोफावलेली दिसून येत आहे. या स्पर्धेतूनच अनेक पाखंडी कलंकित होत आहेत, शांती, संयम आणि औदार्य अशा त्रिगुणांच्या अनोख्या संगमामुळे संतशिरोमणी हृदयसम्माट सत्यसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी लाखो अनुयायी जोडले आणि मानवतेची पूजा करणारा निरंकारी पंथ जगभर पसरविला. संत निरंकारी मिशनमध्ये जगातील सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदू लागले, कारण कोणाच्याही व्यक्तिगत जीवनशैली किंवा श्रद्धा भावनांना धक्का न लावता केवळ मानवतेच्या आधारावर आपुलकी, प्रेम, सद्भावना, सामंजस्याने व एकोप्याने आनंदाने जीवन जगायला शिकवणारी विचारधारा युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजींनी जोपासली व वृद्धिंगत केली. बाबाजी यथार्थ व यशस्वी मानवी जीवन जगण्याची कला शिकवत असत. त्यांनी आध्यात्मिक व भौतिक जीवनाशी अशी सुंदर सांगड घातली, त्यामुळेच जगभर ही विचारधारा लोकप्रिय बनली व हवी हवीसी वाटू लागली. कारण संतोक्तीची प्रचिती त्यांच्या पावन सान्निध्याने आली. जगतगुरु जगतवंद्य संतश्रेष्ठ तुकारामजी महाराजांनी समजाविले होते-

"मागे पुढे ब्रह्म दाटे! म्हणती देव आहे कोठे!!
मृगा नाभिचा परिमळ! व्यर्थ फिरे रानोमाळ!!"
गुरुकृपा झाल्यावरी! ब्रह्म सृष्टी दिसे सारी!!
तुका म्हणे ऐसी भ्रांती! देव असता नाही म्हणती!!

संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या सामाजिक व आर्थिक परिषदेवर संत निरंकारी मंडळाला सल्लागाराचा दर्जा दिला. सन 2013मध्ये बाबाजींना गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने प्रतिष्ठित महात्मा गांधी सेवा मेडलने सन्मानित करण्यात आले, तर सन 2014मध्ये गांधी शांती पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि.5 ऑगस्ट 2015 रोजी इंग्लंडमध्ये स्वेच्छा सामाजिक सेवेसाठी देण्यात येणाऱ्या सर्वोच्च क्वीन्स गोल्डन ज्युबिली ॲवॉर्डने बाबाजींना सन्मानित करण्यात आले. कारण माणसाशी माणसे जोडून मानवता धर्म स्थापित केला. संतश्रेष्ठ गोस्वामी तुलसिदासजींच्या वाणीतून प्रत्यय आला-

"सुनहु देव सचराचर स्वामी।
प्रनतपाल उर अन्तरजामी।।
उर कुछ प्रथम वासना रही।
प्रभु पद प्रीति सरित सो बही।।"
(पवित्र रामचरित मानस: 5-49-3)

(अर्थ: बिभिषणजीने कहा, हे देव, हे चराचर जगत के स्वामी! हे शरणागत के रक्षक! हे सबके हृदय के भीतर के जानने वाले! सुनिए, मेरे हृदय में पहले कुछ वासनाएँ थी। वह प्रभु के चरणों की प्रीतिरुप नदी में बह गईं।)

सत्यसम्राट हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचा जन्म दि.23 फेब्रुवारी 1954 रोजी दिल्ली येथे झाला. सन 1971मध्ये त्यांनी निरंकारी सेवादलामध्ये प्राथमिक सदस्य म्हणून प्रवेश केला आणि सेवादलाची सुती खाकी वर्दी घालून सेवेचा आनंद लुटला. सन 1975 मध्ये त्यांनी निरंकारी युथ फोरमची स्थापना केली. या फोरमचे लक्ष्य होते- साधे व सदाचारी जीवन जगणे, प्रेम व भक्तिपूर्ण सेवा, अनावश्यक उधळपट्टीला आळा आणि नशाबंदी साधणे. दि.24 एप्रिल 1980 रोजी कट्टरपंथी धर्मांधांनी मिशनचे तत्कालीन प्रमुख, सद्गुरु बाबा गुरुबचन सिंहजी यांच्यावर निशाना साधून शहीद केले. तरुण बाबा हरदेवांनी शरीररुपातील सद्गुरु व पिताही गमावला होता. निरंकारी मिशनच्या प्रत्येक अनुयायाचे धैर्य, संयम आणि सहनशीलता पणाला लागावी असा तो क्षण होता. दि.27 एप्रिल 1980 रोजी बाबा हरदेवसिंहजींना मिशनचे सांप्रत सद्गुरु व प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्व स्थापन करण्याचे आश्वासन कृतीत उतरविण्यासाठी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी देश-विदेशांमध्ये विस्तृत प्रचार यात्रा आयोजित केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत निरंकारी मिशन मानवता, विश्वबंधुत्व, प्रेम, शांती, समता, अहिंसा अशी महान ध्येये गाठणारी आध्यात्मिक चळवळ बनून नावारुपाला आली आहे. सर्व धर्मग्रंथांचे अमूल्य सारामृत त्यातून प्रवाहित केले. गुरु नानकदेवजींचे अनमोल वचन सार्थक वाटतात-

"गुरु किरपा जेहि नर पैं कीन्ही तिन यह जुगति पिछानी!
नानक लीन भयो गोबिंद सों ज्यो पानी संग पानी!!"
[पवित्र भजन संग्रह- गीता प्रेस: पृ.सं.180]

सन 2016 मधील जून महिन्याच्या शेवटी होऊ घातलेल्या द्वितीय निरंकारी आंतरराष्ट्रीय संत समागमाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्याच्या उद्देशाने ते कॅनडाच्या कल्याण यात्रेवर असतानाच दि.13 मे 2016 रोजी त्यांची गाडी अपघातग्रस्त झाली आणि त्यातच मानवतेचे कार्य करत असतानाच त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. धन्य धन्य ते हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज आणि त्यांचे अहर्निश मानवोत्कर्षाचे आध्यात्मिक कार्ये! मिशनमधील त्यांच्या भरीव कार्याची आठवण म्हणून त्यांचा स्मृतिदिन हा मिशनतर्फे 'निरंकारी समर्पण दिवस' म्हणून पाळला जात आहे.

"मैं नही तो कुछ न होगा सोचना नादानी हैं।
सारे सिलसिले हैं मुझसे ये कहना बेमानी हैं।
ऐ मिट्टी के पुतले इतना क्यों करता अभिमान तू।
कहे 'हरदेव' इस दुनिया में दो दिन का मेहमान तू।"
[पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.284]

**- संकलन व सुलेखन -**
**संतचरणधूळ: श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**द्वारा- प.पू.गुरुदेव हरदेव कृपानिवास.**
**मु. रामनगर वॉर्ड नं. 20, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**



# संघर्षातून उभा राहिलेला माणुसकीचा प्रवास :
# नदीम लतीफ कुरेशी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्येक माणूस हा संघर्ष करत असतो काही माणसे ही आपल्या आई-वडिलांपासून अनादी काळापासून गर्भ श्रीमंत असतात जी माणसे स्वतःचे काहीच अस्तित्व नाही ती माणसे आपल्या पोटासाठी आपल्या कुटुंबीयांसाठी उपासपोटी राहून संघर्ष मय भूमिका घेऊन आपल्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अथक परिश्रम करतात गरीबीच्या झळा सोसनेफार अवघड असते गरिबीचे जीवन हे जो माणूस जगतो त्यालाच त्याच्या वेदना करतात खरोखरच गरिबीची परिस्थिती ही माणसाला एक प्रकारचा शाप असतो अनेक वेळा उपासमारीची जीवन जगावे लागते नाना प्रकारच्या दुःख वेदना सहन करून आपला उदरनिर्वाह चालवावा लागतो आर्थिक दृष्ट्या दुर्बलअसल्यामुळे आपण आपल्या संपूर्ण गरजा पूर्ण करू शकत नाहीत त्यामुळे गरिबीची परिस्थिती मानवी जीवनाला एक कलंक आहे गरिबीच्या परिस्थितीमध्ये भारतामध्ये मुंबई सारख्या शहरांमध्ये फुटपाथवर झोपून वडापाव खाऊन किंवा हॉटेलचे उष्टे खाऊन स्वतःचाउदरनिर्वाह चालवण्याची अनेक गोरगरीब काम करत असतात अनेक लोक कचरा गोळा करून आपल्या पोटाची खळगी भरण्याचे काम करतात गरीबी ही खरोखरच मानवी जीवनाला लागलेला शाप आहेगरिबी हा माणसाच्या आयुष्यात कधीही येऊ नये असे लोक म्हणतात परंतु आपल्या गरीबी परिस्थितीवर मात करून आपल्या कष्टाच्या जोरावर आपल्या परिसरामाच्या जोरावर आपल्या मेहनतीच्या जोरावर आपलं आयुष्य सुजलाम सुफलाम करणाऱ्या अनेक लोकांचा इतिहास पाहिला तर ही माणसे आपल्या स्वतःच्या कष्टावर समाजामध्ये स्वतःचे नाव कमावण्याचं काम करतात अनेक लोक हे शिक्षणाच्या माध्यमातून काही माणसे व्यापाराच्या माध्यमातून काही माणसे आपल्या कलेच्या माध्यमातून काही माणसेही आपल्या आजचा प्रगल्भ बुद्धिमत्तेच्या जोरावर आपलं नाव रोशन करण्याचे काम करतात आपल्या आयुष्यातील दारिद्र्याला गरिबीला मूठ माती देऊन आपल्या परिश्रमाच्याजोरावर आपलं स्वतःचं नशीब उजळण्याचे काम करतात परळी शहरातील असेच एक उठून ज्या कुटुंबाने अनेक वर्षापासून गरिबीच्या असह्य झळासो सून आपल्या कुटुंबीयांना वरआणण्याचे काम केलं अनेक वेळा उपासपोटी राहून आपल्या जीवनाचा गाडा चालवण्याचं काम केलं परंतु जिद्द चिकाटी परिश्रम मेहनत त्यांच्या जोरावर आपण काहीही करू शकतो ही उदाहरण दाखवून देऊन लतिफ भाई कुरेशी व त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर आपल्या आयुष्याचा कायापालट केला आज परळी शहरांमध्ये शाही नावाचे जे सुप्रसिद्ध हॉटेल आहे या हॉटेलने एक स्वतःचा इतिहास निर्माण केलेला आहे या हॉटेलच्या माध्यमातून अनेक खवय्या लोकांना बिर्याणी व नाना प्रकारच्या जेवणाचा स्वाद मिळण्याचे काम परळी परिसरात केले जातात सदरच्या हॉटेल व्यवसायाने बीड जिल्ह्यामध्ये स्वतःच्या नावाचा दबदबा निर्माण करून प्रत्येक माणसाच्या मनामध्ये विश्वासाचे प्रेमाचे आपुलकीचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण करून प्रत्येक माणूस हा सदरच्या शाही हॉटेलशी तन-मन-धनाने जोडला गेलेला आहे येथील कर्मचारी वर्ग देखील ग्राहकाशी अत्यंत जिव्हाळ्याने आपुलकीने व तन्मयतेने वागून ग्राहकांशी आपुलकीचे नाते निर्माण करण्याचे काम करत आलेला आहे या ठिकाणी स्वच्छता मन प्रसन्न होण्याची साधने असल्याने ग्राहक हा त्या ठिकाणी नियमितपणे जोडला गेलेला आहे स्वतःचे अस्तित्व नसताना शून्यातून आपल्या नावाची ओळख करणं फार अवघड असतो कोणत्याही व्यवसायामध्ये भरभराटीचे दिवस आणण्यासाठी अथक परिश्रमाची जोड द्यावी लागते कोणत्याही व्यवसायामध्ये नावालोकीक कमवायचे असेल तर त्या क्षेत्रामध्ये जनतेमध्ये ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण करून त्या व्यवसायाला उजाळा देण्याचे काम करावे लागते आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रचंड मोठी स्पर्धा आहे प्रत्येक क्षेत्रामध्ये माणसाला संघर्ष करावा लागतो अनेक माणसे आपापल्या पद्धतीने व्यवसाय निर्मिती करतात त्या व्यवसायामध्ये स्वतःचा जीव ओतून त्या व्यवसायाला भरभराटी आणायचं काम करतात काही सामूहिक प्रयत्न करतात काही वैयक्तिक प्रयत्न करतात त्यांच्या प्रयत्नाला यश येते व स्वतःचा उद्योग समूह प्रचंड प्रमाणात जातो असेच शाही हॉटेलच्या संदर्भात सामूहिक प्रयत्नातून व कुरेशी कुटुंबीयांच्या प्रचंड मेहनतीतून या हॉटेलचा नावालोकीक झालेला आहे नदीम खुरेशी यांच्यासारखा एक जबरदस्त व्यावहारिक माणूस याच हॉटेलच्या माध्यमातून नावाला विकास आलेला आहे अत्यंत शांत संयमी स्वभावाचा असलेला प्रत्येक माणसाला आपुलकीच्या भावनेने प्रेमाच्या भावनेने वागणूक देण्याचे काम करणारा विनम्रपणे प्रत्येक माणसाला हसत खेळत बोलणारा एखाद्या माणसाने शिवी जरी दिली तरी त्या माणसाला रागाने कधीच न बोलणारा शांतता ज्यांच्या डोक्यामध्ये वास्तव करते अशा नदीम खुरेशी यांना गरिबीची जाणीव आहे. अनेक गोरगरीब लोकांना सांभाळण्याचं काम ते करत आलेले आहेत त्यांच्या अनेक मित्रमंडळींना पुढे नेण्यासाठी हातभार लावण्याचे काम त्यांनी केलेला आहे. नदीम सेट कुरेशी यांनी अनेक गोरगरीब सामान्य माणसाला आधार देण्याचे काम केलेले आहे आणि गोरगरीब मुस्लिम समाजातील होतकरू व गरीब लोकांना त्यांच्या कार्यात मदत करण्याचे महत्त्वाचे काम केलेला आहे. अत्यंत शांत सुजवळ स्वभावाचा व मितवासी स्वभावाचा असलेला गरिबीची जाणीव असलेला स्वतः गरीबी काय असते याची कल्पना आज काय पण गरिबी त्यांनी भोगलेली आहे गरीबी ही आपल्याच नाहीत कोणाच्याही वाटायला येऊ नये म्हणून प्रत्येक माणसाने गरीब माणसाला साथ देण्याचे काम केलं पाहिजे त्यांचे अडीअडचणीच्या काळामध्ये त्यांना साथ देण्याचे काम केलं पाहिजे जो माणूस गोरगरिबांची सेवा करतो त्या माणसाच्या सातपीड्याचे कधीचवाटोळे होणार नाही. म्हणून प्रत्येक माणसाने गोरगरिबांची सेवा केली पाहिजे. आपल्या हॉटेलमधून जे काही उरलेले व शिजलेले चांगले अन्न असते ते गोरगरिबांना वाटप करून त्यांच्या पोटामध्ये हे अन्न गेलं पाहिजे.म्हणून सदैव प्रयत्नशील असलेला हा माणूस जिथे जगते माणुसकीचे विद्यापीठ म्हणून नदीम शेठ कुरेशीयांच्याकडे पाहिले जाते. अत्यंत मानवी संवेदना जपणारा प्रत्येक माणसाला आदबीने बोलून त्या माणसाचे समाधान करणारा. कोणत्याही माणसाला ओरेरावीचीभाषा न करणारा एकादा गिऱ्हाईक पिऊन जर आलेला असेल तरी त्या माणसाला कधीच वाईट न बोलणारा सदरच्या हॉटेलच्या व्यवसायामध्ये अत्यंत शांतपणे व डोक्यावर बर्फ ठेवून वागण्याचं काम करणारा, आपल्या जवळच्या माणसांना सदैव मदतीचा हात पुढे करणारा जातपात धर्म यांच्या भिंती सोडून अनेक लोकांना मदतीचा हात पुढे करणारा त्यांच्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची भूमिका ठेवणारा गरिबी काय असते याच्या झाला त्यांच्या कुटुंबीयांनी सोसलेले आहेत. म्हणून गरिबावर कधीही अन्याय अत्याचार करू नका हा मंत्र सांगणारा प्रत्येक माणसाचा दिवस येतो म्हणून गरीबाची गरिबी देखील दूर होऊ शकते.हा मंत्र सांगणारा या जीवनामध्ये यशस्वी व्हायचेअसेल तर गरिबांना साथ द्या. गरिबांची लूट करू नका इमाने इतबारे आपण आपल्या क्षेत्रामध्ये काम करा कोणाची फसवणूक करू नका व्याज व्यवहार करू नका गोरगरिबांना लूटू नका हा मंत्र सांगणारा, तुमचा आमचा सर्वांचा लाडका, आदरणीय नदीम लतीफ कुरेश यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा जय भीम जय प्रबुद्ध भारत



-ॲड. दिलीप उजगरे
परळी वै.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

लावण्याचा हा डाव आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून संविधानिक आरक्षण कमकबत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाज कधीही हा अन्याय सहन करणार सहन करणार नाही, असा इशारा वक्त्यांनी दिला, जिल्हाधिकसी कार्यालयासमोर झालेल्या सभेत प्रत्येक समाजघटकाच्या प्रतिनिधींना आपली भूमिका मांडण्याची संधी देण्यात आली. सर्व वक्त्यांनी एकमुखाने उपवर्गीकरणाला कडाडून विरोध दर्शवत शासनाने तात्काळ निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी केली. यानंतर पाच पुरुष व पाच महिलांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले, शासनाने समाजाच्या भावना लक्षात घेऊन त्वरित निर्णय मागे न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

---

तांत्रिक उलथापालथ, ऊर्जा संक्रमण, पुरवठा साखळीतील बदल आणि आर्थिक विकासाच्या भविष्याबद्दलची मोठी अनिश्चितता यांचा समावेश आहे.मात्र, या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हा एकमेव देश मोठ्या प्रमाणावर जगाचा आत्मविश्वास वाढवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारताने गेल्या दशकात स्वतःबद्दल जागतिक स्तरावर नवी प्रतिमा स्थापित केल्याचे प्रारंभीच स्पष्ट करुन फडणवीस यांनी महाराष्ट्र या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितलेदशकानुदशके महाराष्ट्र हे देशाचे ‘इकोनॉमिक इंजिन’ राहिले आहे. पण आता आम्ही त्याहूनही मोठ्या ध्येयासाठी स्वतःला तयार करत आहोत. आज राज्याची अर्थव्यवस्था 61.61 लाख कोटींची ( 660 अब्ज डॉलर्स) असून ती देशाच्या सकल देशांर्गत उत्पादनामध्ये( जीडीपी) सुमारे 15 टक्के योगदान देते. देशात येणाऱ्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास 40 टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे.देशाच्या अभियांत्रिकी निर्यातीत राज्याचा वाटा 20 टक्क्यांहून अधिक असून देशाची ‘डेटा सेंटर’ आणि ‘स्टार्टअप’ राजधानी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

भविष्यातील महाराष्ट्राबाबत आमचा रोड मॅप स्पष्ट असून 2030 पर्यंत एक लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि 2047 पर्यंत जगातील सर्वात महत्त्वपूर्ण प्रादेशिक अर्थव्यवस्थांपैकी एक अशी अर्थव्यवस्था होईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, यावर्षी दावोसमध्ये महाराष्ट्राने जवळपास 30 लाख कोटींचे गुंतवणूक प्रस्ताव आणले. दीर्घकालीन विचार, जलद निर्णय आणि विश्वासार्हतेने अंमलबजावणी या त्रिसुत्रीची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारांच्या शोधात गुंतवणूकदार आहेत. अनिश्चिततेच्या जगात, विश्वास हीच खरी आर्थिक पुंजी असून महाराष्ट्राने हा विश्वास निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक काम केल्याचे त्यांनी सांगितले..भविष्यातील अर्थव्यवस्था ही महामार्ग, बंदरे, विमानतळ, डिजिटल नेटवर्क्स, संशोधन प्रयोगशाळा, स्टार्टअप इकोसिस्टम आणि विद्यापीठांवर उभी असेल आणि म्हणूनच महाराष्ट्रात अभूतपूर्व वेगाने गुंतवणूक होत असल्याचे स्पष्ट करुन मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, समृद्धी महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ,वाढवण बंदर,मेट्रोचे जाळे,औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक इकोसिस्टम, डिजिटल पायाभूत सुविधा आदी प्रकल्प एकत्रितपणे महाराष्ट्राचा आर्थिक भूगोल बदलवत आहेत आणि जेव्हा भूगोल बदलतो, तेव्हा अर्थव्यवस्था बदलते. त्यासाठी केवळ पायाभूत सुविधा पुरेशा नाहीत. भविष्यातील अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करण्यासाठीची क्षमता एआय, सेमीकंडक्टर्स, इलेक्ट्रिक वाहने , प्रगत उत्पादने, स्वच्छ ऊर्जा,डेटा सेंटर्स,जागतिक क्षमता केंद्रे (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स ) आणि ‘डीप-टेक’ कल्पकतेवर आधारित असेल. या निकषावर महाराष्ट्र स्वतःला या बदलाच्या केंद्रस्थानी स्थापित करत आहे.आज राज्यात देशातील सर्वात मोठ्या जीसीसी केंद्रांपैकी 24 टक्के केंद्रे आहेत. राज्य आशियातील सर्वात महत्त्वाचा ‘डेटा इन्फ्रास्ट्रक्चर कॉरिडॉर’ म्हणून उदयास येत आहे. देशातील 60 टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत.इथले ऑटोमोटिव्ह क्षेत्र आता ‘नेक्स्ट-जनरेशन मोबिलिटी’ मध्ये रूपांतरित होत आहे. देशातील 20 टक्के ऑटोमोबाईल उत्पादने आणि ईव्ही उत्पादनातही महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई जागतिक आर्थिक आणि नाविन्यपूर्ण राजधानी म्हणून विकसित होतच राहील.पुणे उत्पादन, तंत्रज्ञान आणि संशोधन केंद्र म्हणून आपली पकड मजबूत करेल.नागपूर हे भारताचे लॉजिस्टिक आणि भौगोलिक-धोरणात्मक केंद्र म्हणून उदयास येत आहे.छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक हे आमचे नवीन युगाचे मॅन्युफॅक्चरिंग हब असतील.गडचिरोली हे 2032 पर्यंत भारताचे सर्वात मोठे ‘ग्रीन स्टील’ उत्पादक जिल्हा बनेल.आणि आमची द्वितीय व तृतीय श्रेणीतील शहरे औद्योगिक विकासाची पुढची इंजिने ठरतील.संतुलित प्रादेशिक विकास हा केवळ सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर तो आर्थिकदृष्ट्याही अत्यंत शहाणपणाचा असल्याचेही फडणवीस यांनी नमूद केले.

---

घेण्याचे निर्देश दिले आहेत.सुप्रीम कोर्टात सोमवारी राज्यातील आरक्षणाअभावी रखडलेल्या 20 जिल्हा परिषद निवडणुकीबाबत सुनावणी पार पडली. यावेळी कोर्टाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची सुनावणी पुढे ढकलली आहे. या प्रलंबित निवडणुकाबाबत सुनावणी पार पडली. यावेळी बाजू मांडल्यानंतर सुप्रीम कोर्टाने या प्रकरणी उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर कोर्टासमोर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत.राज्यातील रखडलेल्या 20 जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची घोषणा कधी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच कोर्टातील सुनावणीवेळी मोठी अपडेट समोर आली आहे. त्यानुसार आता येत्या काळात राजकीय नेत्यांची प्रतीक्षा संपली असून पुन्हा एकदा सुनावणी लांबणीवर पडली आहे.

---

उपस्थित करण्यात आला आहे. भारतात दागिन्यांच्या घडणावळीचे काम करणारे तीन कोटी कारागीर आहेत. ते काम कुठे करणार. मुंबईत एकूण 15 हजार ज्वेलर्स आहेत, त्यांचे काय होणार? सवाल ऑल इंडिया ज्वेलर्स असोशिएशनचे प्रवक्ते कुमार जैन यांनी केला आहे. देशभक्त आम्ही पण आहोत. पण कोणाची रोजीरोटी जायला नको, असे आमचे मत असल्याचे जैन यांनी सांगितले.लोकांनी सोनं खरेदी बंद केलं तर एक कोटी लोकांच्या रोजगारावर गंडांतर येईल, असं मत नागपूरच्या ऑल इंडिया जेम ॲप ज्वेलरचे राजेश रोकडे यांनी व्यक्त केले आहे. सोलापुरातही मोदींच्या आवाहनला सराफा व्यवसायिकांनी विरोध केला आहे. वर्षभर सोनं विकलं नाही तरीही सोन्याचे व्यापारी जगू शकतील. मात्र कारागिरांनी कसं जगायचं, असा सवाल सराफा व्यापारी करत आहेत.

---

काळापासून सांगितले जाते. पूर्वी बारामही वाहणारी नदी अजूनही वर्षात सात-आठ महिने वहात आहे. काळानुरुप अनेक अतिक्रमणे नदीत वाढल्याने नदीचे पात्र अरुंद झाले आहे. परळी नगरपरिषदेने यात नदीला नाला दाखवत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रयत्न केला मात्र जागरुक नागरिकांनी यास विरोध करीत शॉपिंग कॉम्प्लेक्स चे काम बंद पाडले होते. आता शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नदीचे काँक्रीटीकरण करण्याचा घाट घालण्यात आला. याविरोधात परळीकरांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडे तक्रारी करून काम सुरु होऊ नये यासाठी निवेदने देण्यात आली. ना. पंकजाताई मुंडे यांनी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्वरित लक्ष देऊन परळी गावभागाचे वाळवंट होण्यापासून रोखले. परळी वरचं आपलं लक्ष व काळजी यातून दिसते. परळीत होऊ पाहणाऱ्या घातक प्रकल्पाबाबत संवेदनशीलता दाखवत नागरिकांच्या या मागणीची तातडीने दखल घेत, ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षा व पालिका प्रशासनाला पर्यावरण आणि जलस्त्रोतांचा विचार करून काँक्रिटीकरण न करण्याची सूचना केली.

लोकभावनेचा आदर करत घेतलेल्या या निर्णयाबद्दल परळीकरांच्या वतीने अश्विन मोगरकर यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

---

दिनाच्या औचित्यावर 01 मे रोजी सिरसाळा येथे यापूर्वीच अन्नछत्र सेवेचा शुभारंभ करण्यात आला असून तेथे दररोज 90 ते 100 गरजूंना लाभ होत आहे.

परळीसह परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि विविध कामानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांची या भागात दररोज मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा कष्टकरी बांधवांना किमान एक वेळच्या अन्नाची चिंता भासू नये, त्यांच्या पोटाला अन्न मिळावे आणि माणुसकीची ऊब अनुभवायला मिळावी, या उदात्त हेतूने गुरुजींच्या आशीर्वादातून परळी वैजनाथ आणि सिरसाळा येथे ही मोफत अन्नछत्र सेवा सुरु करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना जलनायक मयंक गांधी यांनी सांगितले की, “अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. समाजातील कोणताही व्यक्ती उपाशी राहू नये, हीच आमची भूमिका आहे. मानवतेच्या भावनेतून सुरु केलेली ही सेवा समाजातील माणुसकी अधिक दृढ करेल.”

या उद्घाटन सोहळ्यास डॉ. हरिश्चंद्र वंगे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, विविध व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष माऊली फड, श्रीराम मुंडे, पाटलोबा मुंडे, नंदलाल बियाणी, पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे, माजी नायब तहसीलदार बी.एल. रुपनर, बाजार समितीचे सचिव बलवीर रामदासी यांच्यासह व्यापारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्लोबल विकास ट्रस्टच्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा एक नवा आदर्श निर्माण झाला असून, “भुकेल्याला अन्न” या संकल्पनेतून माणुसकीचा खरा धर्म जपला जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

होता. याप्रकरणी संबंधित डॉक्टरांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती.

घटनेची गंभीर दखल घेत जिल्हा शल्य चिकित्सकांनी चार सदस्यीय वैद्यकीय चौकशी समिती स्थापन केली. ही समिती आता रुग्णालयातील उपचार प्रक्रिया, वैद्यकीय कागदपत्रे, तपासण्या तसेच संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांची माहिती तपासणार आहे. तसेच रुग्णाच्या नातेवाईकांची बाजूही ऐकून घेतली जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.

समितीकडून संपूर्ण चौकशी पूर्ण झाल्यानंतर अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर केला जाणार आहे. या अहवालानंतर संबंधित डॉक्टरांविरोधात पुढील कारवाई होणार की नाही, हे स्पष्ट होणार असल्याने या प्रकरणाकडे शहराचे लक्ष लागले आहे.

---

घेण्यात आले. महिला हा एकमेव निकष लावून हे अर्ज स्वीकारण्यात आले होते. त्यामुळे श्रीमंत घरातील महिलांनीही पंधराशे रुपयांच्या लालसेपोटी अर्ज भरले होते.अडीच लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न, घरात चार चाकी वाहन असलेल्या कुटुंबातील महिलांनाही या सरकारी पैशाचा मोह आवरला नाही. त्यामुळे पहिल्यांदा सरकारला दोन कोटी 53 लाख लाडक्या बहिणींना कोट्यावधी रुपयाचे सरकारी अनुदान द्यावे लागले. त्यानंतर थोडी टीका झाल्यानंतर ही संख्या दोन कोटी 47 लाखापर्यंत खाली आली. अपात्र महिलांनाही सरकारी अनुदान देण्यात येत असल्याची टीका जोर धरु लागली.त्यानंतर परिवहन विभागाकडून चार चाकी वाहने असलेल्या लाडक्या बहिणींच्या कुटुंबांची माहिती मागविण्यात आली. इतर सरकारी योजनांचा फायदा घेणाऱ्या महिलांची कृषी विभागाकडून पडताळणी सुरु करण्यात आली. सरकारच्या आय टी विभागाने अनेक लाडक्या बहिणींना अपात्र ठरविले.

सरते शेवटी लाडक्या बहिणीची ही संख्या दोन कोटी 43 लाख पर्यंत खाली आली. ऑक्टोंबर नोव्हेंबर मधील विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी सरकारला भरभरून मतदान केले. त्यामुळे महायुती सरकारला निर्विवाद बहुमत मिळाले आणि हे सरकार सत्तेवर आले. भाजपला जास्त जागा मिळाल्यामुळे एकनाथ शिंदे यांचा पत्ता कट झाला. देवेंद्र फडणवीस या राज्याचे नवे मुख्यमंत्री झाले.

---

## पान 4 वरुन

दर्शवताना आपल्यावर होत असलेली ही कारवाई आपण कोणत्याही ईडी किंवा सीबीआय सारख्या यंत्रणेत अडकू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारे राजकीय आकसापोटी ही कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे समिती जो निर्णय देईल तो मान्य आहे.आपण कोणत्याही असंसदीय शब्दाचा वापर केलेला नाही. आपल्या वक्तव्याबद्दल आपण माफी मागणार नाही. समिती जी शिक्षा करेल ती भोगण्यास तयार असल्याचे सुषमा अंधारे म्हणाल्या. आपण कुणाला कामराला वैयक्तिकरीत्या ओळख नसल्याचेही त्यांनी समितीसमोर स्पष्ट केले.

---

आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत दुकानातील आर्थिक हानी झाली होती. या दोन्ही घटनांमुळे आष्टी तालुक्यातील व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

---

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आईंसाठी खास सरप्राईज डान्स सादर केला. आपल्या लेकरांना रंगमंचावर पाहताना अनेक मातांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. मातांसाठी घेण्यात आलेल्या मजेशीर खेळांमुळे संपूर्ण परिसरात हास्य आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक - सौ. चैत्राली देशमुख व शांभवी देशमुख, द्वितीय क्रमांक - सौ. प्रिया काकाणी व स्वरा काकाणी, तृतीय क्रमांक - सौ. मनीषा घोलवे व विहान घोलवे कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. बांगड सर व प्रा. कैलास घुगे सर यांच्यासह व्यवस्थापन टीमने सर्व मातांचे आभार मानले. प्रेम, माया, आनंद आणि अविस्मरणीय क्षणांनी सजलेला हा बचपन प्ले स्कूलचा मदर्स डे प्रत्येकाच्या मनात कायमस्वरुपी घर करून गेला.

---

नियोजन करावे असं बोर्डीकर यांनी म्हटलं आहे.अनेक गावांना नदीच्या पुरामुळे धोका निर्माण होत असल्याने अशा ठिकाणी तातडीने आणि कायमस्वरुपी उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. गावांची सुरक्षा महत्त्वाची असून पूरनियंत्रणाची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना श्रीमती बोर्डीकर यांनी दिल्या.पाणीटंचाईची समस्या लक्षात घेता सर्व कामांचे नियमित ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले. जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविण्याबरोबरच ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजना अधिक परिणामकारकरित्या अंमलात आणावे .धरणांतील गाळ काढून तो शेतीसाठी वापरण्यासाठी शेतकऱ्यांना पुढाकार घेण्याचे आवाहन मंत्र्यांनी केले.बैठकीत सध्या अनेक गावे टँकरद्वारे पाणीपुरवठ्यावर अवलंबून असल्याची माहिती देण्यात आली. काही गावांमध्ये नियमित दोन ते तीन टँकर सुरु असून भविष्यात पाणी साठवण व्यवस्थेत सुधारणा झाली नाही तर आणखी गावांना टँकरची गरज भासू शकते, काही ठिकाणी पूर्वीची कामे अपूर्ण आहेत ते तातडीने पूर्ण करावेत. संपूर्ण नदीपात्राचे वैज्ञानिक पद्धतीने रुंदीकरण, गाळ काढणे आणि पावसाळ्यापूर्वी नियोजनबद्ध कामे करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शेतकऱ्यांसाठी सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने पाइपलाइनद्वारे पाणी वितरण, प्रेशर इरिगेशन प्रणाली, ठिबक सिंचन आणि कार्यक्षम पाणी वापर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला. बंद पाइपलाइन प्रणालीमुळे पाण्याची गळती कमी होऊन अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले. पाण्याची बचत, जलसाठा वाढ आणि शाश्वत सिंचन व्यवस्थेमुळे शेती उत्पादनवाढीस चालना मिळेल असे श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले.

---

करुन परस्परांमध्ये प्रेम व समज वाढवली पाहिजे. “भाषा वेगळी असली तरी भावना एकच आहे” हा संदेश आंतरभारतीच्या माध्यमातून दिला जातो.या दिवसानिमित्त विविध ठिकाणी भाषण व चर्चासत्रे, कविता, गीत व साहित्य वाचन, विविध भारतीय भाषांचा परिचय,सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मतेवर मनोगते, असे उपक्रम आयोजित केले जातात. आंतरभारती दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे “विविधतेत एकता” ही भारतीय संस्कृती अधिक दृढ करणे हा आहे.अंबाजोगाईत आंतरभारती दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शैलजा बरुरे या होत्या, तर कार्यक्रमाचे आयोजन आंतरभारती शाखेचे सचिव प्रा. संतोष मोहिते यांनी केले.साहित्य, भाषा, संस्कृती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी आंतरभारतीच्या कार्याचा गौरव करत आपले अनुभव मांडले. कार्यक्रमास प्रा. शैलजा बरुरे, संतोष मोहीते, महावीर भगरे, वैजनाथ शेंगुळे, शरद लंगे, व्यंकटेश जोशी, आशा अमर हबीब, प्रभावती अवचार मॅडम, किरण देशमुख, सिद्धेश्वर स्वामी, संतोष बोबडे, मुस्तफा पठाण यांच्यासह आंतरभारती चे आजीवन सभासद यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

---

आहे. हातभट्टी दारुमुळे परिसरात गुन्हेगारी, व्यसनाधीनता आणि सामाजिक असुरक्षितता वाढत असल्याचीही चिंता व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, कायमस्वरूपी कारवाई होत नसल्याने अवैध धंदेवाल्यांचे मनोबल दिवसेंदिवस वाढत आहे. “छापे पडतात, फोटो काढले जातात, बातम्या झळकतात; पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा धंदा सुरु होतो,” अशी तीव्र नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

दरम्यान, आता तरी पोलिस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठोस पावले उचलून या अवैध हातभट्टी व्यवसायाचा कायमचा बंदोबस्त करावा, अन्यथा भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर परिणामांना जबाबदार कोण, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

---

माजलगाव येथील एका खासगी रुग्णालयात नेले. तेथे तिची सोनोग्राफी केली असता, ती दोन महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आले. हा अहवाल पाहताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. अधिक चौकशी केली असता, चुलत भावानेच हे कृत्य केल्याचे निष्पन्न झाले.

घटनेचे गांभीर्य लक्षात न घेता आणि कायद्याची पायमल्ली करत, माजलगावमधील एका खासगी रुग्णालयात पीडितेचा गर्भपात घडवून आणण्यात आला. मात्र, या प्रक्रियेनंतर पीडितेची प्रकृती कमालीची खालावली.

तिची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला तातडीने अधिक उपचारासाठी बीड येथील जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या तिच्यावर उपचार सुरु असून तिची प्रकृती स्थिर नसल्याचे समजते.

अल्पवयीन मुलीचा गर्भपात करण्यापूर्वी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे आणि पोलिसांना माहिती देणे बंधनकारक असते. मात्र, संबंधित डॉक्टरने कोणत्याही नियमाचे पालन न करता गुपचूप गर्भपात उरकला. हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्याने माजलगाव पोलिसांनी संबंधित डॉक्टरचा शोध घेण्यासाठी चक्र फिरवली आहेत. संबंधित डॉक्टरवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन माजलगाव पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अत्याचार करणारा मुलगा स्वतः अल्पवयीन असल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड हे करत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात संताप व्यक्त केला जात असून, आरोपी आणि बेजबाबदार डॉक्टरवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

---

केली असताना विजय थलपती यांच्या पक्षाने स्वतंत्र भूमिका घेतली. त्यामुळे भविष्यात त्यांना ‘दक्षिणेतील केजरीवाल’ बनवण्याचा काही राजकीय डाव आखला जात आहे का, याबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे.” ते पुढे म्हणाले की, “आज देशातील अनेक प्रादेशिक पक्षांना कमकुवत करणे, विरोधकांचे मत विभाजित करणे आणि नवीन चेहरे पुढे करून राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न सुरु आहे का, हा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.” पश्चिम बंगालमधील निवडणुकांबाबत बोलताना ॲड. चव्हाण यांनी मतदार याद्यांमधून नावे गायब होण्याच्या मुद्द्यावर गंभीर चिंता व्यक्त केली. “जर मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे मतदान यादीतून गायब होत असतील आणि त्यानंतर निर्वाचन आयोग केवळ पुढच्या वेळी मतदानाचा अधिकार राहील असे सांगत असेल, तर हा लोकशाहीवरील गंभीर प्रश्न आहे,” असे त्यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले की, “लोकशाहीमध्ये प्रत्येक मत महत्त्वाचे असते. जर एखाद्या नागरिकाला मतदानापासून वंचित ठेवले गेले, तर तो केवळ प्रशासकीय दोष राहत नाही, तर तो संविधानिक अधिकारांवर आघात ठरतो.” त्यांनी निवडणूक आयोगाने या बाबतीत अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. ईव्हीएम संदर्भातही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. “देशात सतत ईव्हीएमवर संशय व्यक्त केला जातो. मतदारांच्या मनात जर शंका निर्माण होत असतील, तर त्या दूर करण्याची जबाबदारी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारची आहे. लोकशाही केवळ निवडणुका घेण्याचे नाव नाही, तर त्या निवडणुकांवर जनतेचा विश्वास असणे अत्यंत महत्त्वाचे आहे,” असे त्यांनी नमूद केले. ॲड. चव्हाण यांनी पुढे आरोप केला की, “देशात विरोधी मत कमकुवत करण्यासाठी विविध राजकीय डावपेच रचले जात आहेत. लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक असली पाहिजे.” त्यांनी केंद्र सरकारवर टीका करत म्हटले की, “जर निवडणुकीच्या प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित होऊ लागले, तर देशातील लोकशाही धोक्यात येईल.” ते म्हणाले की, “भारताचा इतिहास हा लोकशाही मूल्यांचा आणि संविधानाचा इतिहास आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. तो अधिकार हिरावला जाणार नाही, याची हमी शासनाने दिली पाहिजे.” जनहित लोकशाही पार्टीच्या माध्यमातून या विषयावर न्यायालयीन लढा उभारण्याचाही इशारा त्यांनी दिला. “जर लोकशाही प्रक्रियेमध्ये कुठलाही अन्याय होत असेल, तर त्याविरोधात न्यायालयीन मार्गाने लढणे हे प्रत्येक लोकशाहीवादी नागरिकाचे कर्तव्य आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले. ॲड. चव्हाण यांनी पुढे म्हटले की, “आज देशातील सामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण होत आहेत – लोकशाही टिकणार का? संविधान सुरक्षित आहे का? निवडणुका खरोखरच निष्पक्ष आहेत का? या प्रश्नांची उत्तरे देणे सरकार आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे.” त्यांनी निवडणूक आयोगालाही आवाहन केले की, “देशातील प्रत्येक मतदाराचा विश्वास टिकवण्यासाठी आयोगाने कठोर आणि पारदर्शक पावले उचलली पाहिजेत. मतदान प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा संशय राहू नये.” एकंदरीत, ॲड. शंकर चव्हाण यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे निवडणूक प्रक्रिया, मतदार यादी, ईव्हीएम आणि लोकशाही यांवर नव्याने चर्चा सुरु झाली आहे. सोशल मीडियावरही त्यांच्या वक्तव्याची मोठ्या प्रमाणात चर्चा होत असून, आगामी काळात या विषयावर राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

कारमधून आलेल्या बाळू थोरात यांनी संबंधित महिलेबाबत जातीवाचक आणि अश्लील वक्तव्य करत तिच्या पतीशी वाद घातला. यावेळी महिलेच्या पतीने विरोध दर्शविल्यानंतर आरोपीने संबंधित महिलेकडे शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून केज पोलिस ठाण्यात बाळू थोरात याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम 74, 75, 351(2), 352, 356 तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास प्रभारी पोलिस उपअधीक्षक ऋषिकेश शिंदे करीत आहेत.

---

मात्र, त्याच्या कुटुंबीयांनी तशी प्रक्रिया केली नव्हती. सौदीतून परतल्यानंतर हा प्रकार त्याच्या लक्षात आला. त्याने नगरपालिकेत चौकशी केली असता, नोंदणी करताना कार्यालयीन प्रक्रिया पार पाडली नसल्याचे समोर आले.

याबाबत त्याने मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. मुख्याधिकाऱ्यांनी त्याची दखल घेत संबंधित कर्मचाऱ्यावर कार्यालयीन कारवाई करून योग्य नोंद करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, तो व्यक्ती संबंधित कर्मचाऱ्यावर मी सांगतो तशीच कठोर कारवाई करा, असा वारंवार आग्रह धरत होता. मुख्याधिकाऱ्यांनी नियमबाह्य काम करण्यास नकार दिला. या रागातून संबंधित व्यक्तीने मुख्याधिकाऱ्यांना थेट जीवे मारण्याची धमकी दिली. या गंभीर प्रकारानंतर पालिकेत खळबळ उडाली आहे.

संबंधित तक्रारदाराने केलेल्या तक्रारीची दखल घेऊन आम्ही कारवाई केलेली आहे. मात्र, त्यांच्याकडून वारंवार विशिष्ट आणि नियमबाह्य कारवाईसाठी आग्रह धरला जात होता. ते शक्य नसल्याचे स्पष्ट सांगितल्यानंतर त्यांनी मोठ्या आवाजात धमकी देण्यापर्यंतचा प्रकार केला. यासंदर्भात मी पोलिसांना पत्र दिले असून, सोमवारी रीतसर तक्रार दाखल करणार आहे, अशी माहिती मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी दिली.

---

75.60% गुण मिळवले, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव कागदे, प्रमुख पाहुणे गणेश सानप, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कदम, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापिका श्रीमती टेकाळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक जाधव, भड, पवार, चव्हाण, चिंचोलकर, श्रीमती आमटे, श्रीमती जाधव उपस्थित होते, तसेच पालक वर्ग व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी सर्वांनी अनमोल असे मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती थोरात यांनी केले, तर आभार पवार यांनी मानले .

---

उभारणीच्या करारामध्ये ब्रँडेड कंपनीचे मटेरियल वापरण्याबाबत निश्चित करण्यात आले होते.

परंतु या कर्नावट बंधुंनी कराराचा भंग करत लोकल कंपनीचे मटेरियल वापरले, तसेच काम देखील अर्धवट ठेवले आहे. याबाबत गायकवाड यांनी जाब विचारल्यानंतरही उर्वरित कामाच्या पूर्ततेबाबत व दर्जाबाबत ठोस उत्तर कर्नावट यांनी दिले नाही. यामुळे गायकवाड यांनी दोन महिन्यांपूर्वी पेठबीड पोलिसात तक्रार दिली होती.

त्यावर आता 9 मे रोजी दयानंद गायकवाड यांच्या फिर्यादीवरून महावीर संतोषकुमार कर्नावट, आयुष संतोषकुमार कर्नावट या बंधूंविरोधात 77 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गु.र.नं. 132/ 2026 कलम 318 (2), 318 (3), 318 (4) अन्वये पेठबीड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीडमधील व्यावसायिक गायकवाड यांची तब्बल 77 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक झाल्यानंतर त्यांनी पेठबीड पोलिस ठाणे गाठत दोन महिन्यांपूर्वी तक्रार दिली होती. परंतु प्रकरण दिवाणी असल्याचे सांगत गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. या प्रश्नावर गायकवाड यांनी पाठपुरावा सुरु ठेवत वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेत आपली कैफियत मांडली, तेव्हा कुठे हा गुन्हा दाखल झाला. दरम्यान, कर्नावट बंधु हे संभाजीनगर जिल्ह्यातील एका आमदाराचे नातेवाईक आहेत, त्यामुळेच गुन्हा दाखल केला नव्हता अशी देखील आता चर्चा होऊ लागली आहे.

---






हॅलो बीड

परळी संघर्षनेता

मंगळवार दि. 12 मे 2026



# मी माफी मागणार नाही, शिक्षा भोगण्यास तयार, हक्कभंग समितीसमोर सुषमा अंधारे यांची साक्ष



मुंबई: आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी कोणतेही विधान केलेले नाही. आपले विधान हे हॅबिटॅट स्टुडिओत झालेल्या तोडफोड करणाऱ्यांविरोधात होते. त्यात कोणीही विधिमंडळाचा सदस्य नव्हता. आपल्या विधानाचा विपर्यास करण्यात आला असून माफी मागणार नाही. हक्कभंग समितीचा आदर ठेवून त्यांनी कोणतीही शिक्षा दिल्यास ती भोगण्यास तयार असल्याचे शिवसेना (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी हक्कभंग समितीसमोर झालेल्या सुनावणीदरम्यान स्पष्ट केले.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबनात्मक गाण्याला पाठिंबा देणारे वक्तव्य केल्यामुळे शिवसेना (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात विधान परिषदेत हक्कभंग मांडण्यात आला होता. या हक्कभंगावरील सुनावणी हक्कभंग समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांच्यासमोर पार पडली. यावेळी समितीचे सदस्य आमदार अनिल परब, प्रवीण दरेकर, मनीषा कायंदे उपस्थित होत्या. या सुनावणीवेळी सुषमा अंधारे यांना त्यांनी कुणाल कामगाराच्या विडंबात्मक गाण्याला पाठिंबा देणाऱ्या समाजमाध्यमावरील संदेश तसेच वक्तव्यावरून स्पष्टीकरण विचारण्यात आले.

याला उत्तर देताना अंधारे यांनी आपण केलेले वक्तव्य हे एकनाथ शिंदे यांच्याविषयी नव्हते. समितीच ते वक्तव्य एकनाथ शिंदे यांच्याविषयी असल्याचे सांगत आहे. आपले वक्तव्य हे हॅबिटॅट स्टुडिओची तोडफोड करणाऱ्यांविरोधात होते. मात्र त्याचा विपर्यास करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी समितीने आपल्यावर होणारी कारवाई ही राजकीय कारणाने होत असल्याचे वाटत आहे का, असे विचारले असता त्याला सुषमा अंधारे यांनी होकार पान 3 वर

# आष्टी तालुक्यात शिरापूर, केरूळमध्ये आगीचे तांडव! दोन किराणा दुकाने जळून खाक;

## लाखो रुपयांचे नुकसान



कडा ( बीड) : आष्टी तालुक्यातील शिरापूर येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत एका किराणा दुकानाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. ऋषिकेश हरिश्चंद्र जगताप यांचे गावातील मुख्य चौकात 'स्वामी समर्थ किराणा आणि जनरल स्टोअर्स' नावाचे दुकान आहे. सोमवारी पहाटे 4 वाजेच्या सुमारास दुकानातून मोठा आवाज आल्याने ऋषिकेश बाहेर आले असता, त्यांना दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे दिसले.आग लागल्याचे समजताच ऋषिकेश यांनी तातडीने ग्रामस्थांना पाचारण केले. संतोष तागड, सागर जगताप, हनुमंत देवकर यांच्यासह अनेक तरुणांनी विद्युत मोटारी सुरु करून आग विझवण्याचा शर्थीचा प्रयत्न केला. मात्र, आगीने रौद्ररूप धारण केल्याने दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले. सुमारे दोन तास मदतकार्य सुरु होते, पण दुर्दैवाने काहीच वाचवता आले नाही.दुसरी घटना रविवारी रात्री केरूळ (ता. आष्टी) येथे घडली. दिलीप भंडारी यांच्या किराणा दुकानाला अचानक लागलेल्या आगीत दुकानाचे मोठे नुकसान झाले आहे. येथेही ग्रामस्थांनी आणि अग्निशमन बंबाने पान 3 वर

# आईच्या प्रेमाचा उत्सव...

## बचपन प्ले स्कूलमध्ये मदर्स डे भावनिक वातावरणात साजरा



परळी /प्रतिनिधी -"आई" हा प्रत्येकाच्या आयुष्यातील पहिला गुरु, पहिली मैत्रीण आणि आयुष्यभर सावलीसारखी साथ देणारी व्यक्ती... अशाच मातृत्वाच्या निस्वार्थ प्रेमाला सलाम करण्यासाठी बचपन प्ले स्कूल, परळी वैजनाथ येथे मदर्स डे अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

आई आणि लेकरांमधील अतूट नात्याची सुंदर अनुभूती देणारी Mother & Child Fireless Cooking Competition यावेळी आयोजित करण्यात आली होती. छोट्या छोट्या हातांनी आईच्या मदतीने तयार केलेले पदार्थ, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि आईच्या डोळ्यातील मायेची चमक पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले. पान 3 वर

# शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी, टँकर संख्या वाढणार; राज्यमंत्री मेघना बोर्डीकरांचे सुतोवाच



राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. आज पाणीपुरवठा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी निर्मल भवन येथील एमएसआरडीसी कार्यालयात आयोजित आढावा बैठक बोलावली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होण्यासाठी जलसाठा वाढवणे, सिंचन क्षमता विस्तार करणे आणि पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असून यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश दिले. या बैठकीला व्हीसीद्वारे जिल्हाधिकारी संजय चव्हाण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत भूजल पातळी वाढविण्यासाठी व्यापक उपाययोजनांची आवश्यकता. अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीसाठी पाटाचे पाणी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर , पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी तलाव, तळी, धरणे आणि कालव्यांच्या दुरुस्ती व सक्षमीकरणाची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना बोर्डीकर यांनी दिल्या आहेत.दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पावसाचे आणि पुराचे पाणी वाहून जाते यावर उपाय म्हणून नद्या व तलावांचे खोलीकरण, नवीन चेकडॅम व बंधारे उभारणे, नाला बांधकाम सुधारणा तसेच पुराचे पाणी प्रभावीपणे साठविण्याचे पान 3 वर

# आंतरभारती दिन उत्साहात साजरा



आंबाजोगाई (प्रतिनिधी) आंतरभारती शाखा आंबाजोगाईच्या वतीने दिनांक 10 मे 2026 रोजी आंतरभारती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त "आंतरभारतीतील माझा प्रवास" या विषयावर उपस्थित मान्यवर व सदस्यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम सायंकाळी 6 ते 7 या वेळेत प्रा. संतोष मोहिते सरांचे कॉम्प्युटर वर्ल्ड, जयवंती नगर, आंबाजोगाई येथे पार पडला. आंतरभारती दिन का साजरा केला जातो

आंतरभारती दिन हा भारतातील विविध भाषा, संस्कृती आणि प्रांतांमध्ये बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. मराठी साहित्यिक साने गुरुजी यांनी "आंतरभारती" ही संकल्पना मांडली होती.त्यांच्या मते, भारतातील प्रत्येकाने इतर भारतीय भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर पान 3 वर

# उपळी—गावंदरा वेशीवर अवैध हातभट्टीचा सुळसुळाट; पोलिस कारवाईवर प्रश्नचिन्ह



वडवणी प्रतिनिधी :

वडवणी तालुक्यातील उपळी व गावंदरा गावाच्या वेशीवर अवैध हातभट्टी दारू निर्मितीने पुन्हा डोके वर काढले असून प्रशासनाच्या कारवाईलाच उघड आव्हान दिले जात असल्याचे चित्र समोर आले आहे. अनेक वर्षांपासून सुरु असलेला हा बेकायदेशीर व्यवसाय आता अक्षरशः कळसाला पोहोचल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

काही दिवसांपूर्वी वडवणी पोलिसांनी अवैध दारू विक्रेत्यांवर छापेमारी करून कारवाई केल्याचा दावा केला होता. मात्र ही कारवाई केवळ औपचारिक होती का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. कारण धाडीला काहीच दिवस उलटत नाहीत तोच उपळी–गावंदरा वेशीवर पुन्हा खुलेआम हातभट्टी दारू तयार होत असल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे गावाच्या प्रवेशद्वारावरच हा अवैध व्यवसाय सुरु असल्याने संबंधितांना प्रशासनाची भीतीच उरलेली नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हजारो युवकांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या व्यवसायाकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून विचारला जात पान 3 वर

# नात्याला काळिमा : अल्पवयीन बहिणीवर चुलत भावानेच केला अत्याचार

## गर्भपात करणारी महिला डॉक्टर पोलिसांच्या रडारवर



माजलगाव, पुढारी वृत्तसेवा : तालुक्यात माणुसकीला आणि पवित्र नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका 15 वर्षीय भोळसर मुलीवर तिच्याच 14 वर्षीय चुलत भावाने अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला असून, या कृत्यामुळे पीडित मुलगी दोन महिन्यांची गर्भवती राहिली होती. दरम्यान, पीडितेचा गर्भपात करून तिचा जीव धोक्यात घालणारी महिला डॉक्टर पोलिसांच्या रडारवर आहे. पीडित मुलगी ही स्वभावतः भोळसर आहे. तिच्या याच असहायतेचा फायदा घेत तिच्या 14 वर्षीय चुलत भावाने तिच्यावर वारंवार अत्याचार केला. काही दिवसांपूर्वी पीडित मुलीच्या पोटात तीव्र वेदना होऊ लागल्याने कुटुंबीयांनी तिला तपासणीसाठी पान 3 वर

# लोकशाही धोक्यात आहे का? निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न; भाजपाच्या रणनीतीवर प्रदेशाध्यक्ष ॲड. शंकर चव्हाण यांचा हल्लाबोल



मुंबई | प्रतिनिधी :देशातील अलीकडील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया, मतदार याद्या, ईव्हीएम आणि राजकीय रणनीती यावरून मोठी चर्चा सुरु झाली असताना मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता तथा जनहित लोकशाही पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. शंकर चव्हाण यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरून केंद्र सरकार आणि भाजपावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. "देशात लोकशाही शाबूत आहे की नाही?" असा थेट सवाल करत त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त केली आहे. ॲड. शंकर चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील राजकीय घडामोडींचा उल्लेख करत म्हटले की, "तामिळनाडूमध्ये विजय थलपती यांच्या पक्षाच्या वाढत्या प्रभावाकडे देशभराचे लक्ष लागले आहे. मात्र या राजकीय समीकरणामागे भाजपाची काही वेगळी रणनीती आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. भाजपाने सीट शेअरिंगची अपेक्षा व्यक्त पान 3 वर

# केज तालुक्यात आंतरजातीय विवाह केलेल्या तरुणीचा विनयभंग

## केज तालुक्यात पिसेगाव फाटा परिसरातील घटनेने खळबळ



केज: केज तालुक्यात आंतरजातीय विवाह केलेल्या एका तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध ॲट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी (दि. 11) सकाळी पिसेगाव फाटा परिसरात घडली. मिळालेल्या माहितीनुसार, आदिवासी समाजातील एका तरुणीने सहा वर्षांपूर्वी उच्चवर्णीय तरुणासोबत आंतरजातीय विवाह केला असून दोघेही सध्या एकत्र राहत आहेत. रविवारी (दि. 11) हे दाम्पत्य गावाहून केज येथे खरेदीसाठी दुचाकीवरून येत होते. दरम्यान, पिसेगाव फाट्याजवळील मानवलोक कार्यालयासमोर त्यांच्या परिचयातील एका व्यक्तीने हात दाखवून त्यांना थांबविले. पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट पान 3 वर

# सय्यद समीया दहावीच्या परीक्षेत यश



पाटोदा / प्रतिनिधी येथील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. अशरफ यांची मुलगी सय्यद समिया अशरफने दहावीच्या परीक्षेत 91.60 % गुण घेत पाटोदा येथील लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल या शाळेत तिसरा क्रमांक घेतला आहे.

या यशाच्या अनुषंगाने शाळेमार्फत विशेष प्राविण्य मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यात सय्यद समीया हीचाही सत्कार करण्यात आला. सय्यद समीया हिच्या यशाबद्दल सर्व मित्र परिवार व नातेवाईकांनी तिला पुढील आयुष्यासाठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्लॉटच्या नोंदीवरून बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी

## आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांत तक्रार



बीड : पुढारी वृत्तसेवा प्लॉटच्या व्यवहाराची नोंद घेताना झालेली चूक दुरुस्त करावी आणि संबंधित कर्मचाऱ्यावर आपल्या मर्जीप्रमाणे कारवाई करावी, या मागणीसाठी एका व्यक्तीने थेट मुख्याधिकाऱ्यांनाच जीवे मारण्याची धमकी दिली. हा खळबळजनक प्रकार बीड नगरपालिकेत घडला असून, मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी याप्रकरणी 7 मे रोजी पोलिसांना पत्र दिले आहे. आज, सोमवारी ते रीतसर गुन्हा दाखल करणार आहेत. बीड शहरातील मूळ रहिवासी असलेला एक व्यक्ती गेल्या काही वर्षांपासून सौदी अरेबियात वास्तव्यास होता. त्याने तिथून वेळोवेळी पाठवलेल्या पैशांची गुंतवणूक स्वतःच्या नावे व्हावी, असा त्याचा आग्रह होता. पान 3 वर

# इंदिरा विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न



बीड / प्रतिनिधी इंदिरा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय नगर रोड बीड, या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष 2025 - 26 मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा दि. 11 मे 2026 रोजी संपन्न झाला. या निकालात प्रथम क्रमांक कु, श्रुती सुभाष यादव हिने 87.60% गुण मिळून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे, तसेच द्वितीय क्रमांक सानप वैभवी विष्णू 84.60% गुण मिळवले आहेत, तसेच तृतीय क्रमांक घोलप पूनम वचिष्ट 75.80% व तृतीय क्रमांक घाडगे मीरा विनोद पान 3 वर

# वेअरहाऊस उभारताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून 77 लाखांची फसवणूक

## छत्रपती संभाजीनगरच्या कर्नावट बंधुंवर पेठ बीड पोलिसांत गुन्हा




बीड, : वेअर हाऊस उभारणीसाठी करारामध्ये ठरल्या प्रमाणे साहित्य न वापरता निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या संभाजीनगर येथील रुपम पीईबी कंपनीच्या मालकांवर पेठबीड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीडमधील व्यावसायिकाची तब्बल 77 लाख रुपयांची फसवणूक या प्रकरणात झाली असून याचा अधिक तपास पोलिस करत आहेत. बीड ते पिंपळनेर रोडवर दयानंद गायकवाड यांनी वेअर हाऊस उभारणीचे काम हाती घेतले आहे. यासाठी त्यांनी संभाजीनगर येथील कर्नावट नामक व्यवसायिकाशी करार केला होता. करारामध्ये ठरल्याप्रमाणे गायकवाड यांनी कर्नावट यांना 77लाख 50 हजार रुपये अदा केले आहेत. वेअर हाऊस पान 3 वर